# WILL of GOD
# 316

## मी परमेश्वराची इच्छा कशी जाणून घेऊ?

*"देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या."* रोम १२:२

परमेश्वराची इच्छा जाणून घेणे आणि ती पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. येशूसारखे व्हा. त्याने म्हटले की तो पृथ्वीवर आला, *"मी स्वतःच्या इच्छेप्रमाणे नव्हे, तर ज्याने मला पाठवले त्याच्या इच्छेप्रमाणे करावे म्हणून स्वर्गातून उतरलो आहे,"* योहान ६:३८. परमेश्वराची बरीचशी इच्छा सर्व विश्वासणाऱ्यांना सारख्याच प्रकारे लागू होते. तथापि, परमेश्वराची विश्वासणाऱ्यांसाठी वैयक्तिक इच्छा देखील असते, जी तो तुमच्या दैनंदिन विश्वासूपणात त्याच्यासोबत चालताना, तुम्ही जसे वाढता तशी हळूहळू प्रकट करतो. तुम्ही परमेश्वराची इच्छा जाणून घेऊ शकता. तो तुम्हाला समज देईल. *"तू आपल्या अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव, आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नकोस; तू आपल्या सर्व मार्गांत त्याचा आदर कर, म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल"* नीतिसूत्रे ३:५-६. सर्व विश्वासणाऱ्यांसाठी परमेश्वराची सर्वसाधारण इच्छा तुम्हाला पवित्र शास्त्रातून कळते. त्याची तुमच्यासाठी असलेली वैयक्तिक इच्छा तुम्हाला त्याच्या वचनाशी विसंगत नसलेल्या, विश्वासू आणि आज्ञाधारक जीवनाच्या संयोगातून कळते. त्या आज्ञाधारकतेच्या आधारावरून तुम्ही तुमच्यासाठी त्याची इच्छा ओळखू शकता आणि पाळू शकता. पित्याकडे मागा. त्याच्या वचनातून, त्याच्या ज्ञानातून, त्याच्या लोकांतून आणि त्याच्या शांतीतून मार्गदर्शन मिळवा. जेव्हा तुम्हाला परमेश्वराची इच्छा समजेल, तेव्हा त्याची आज्ञा पाळा.

**परमेश्वराची सर्वसाधारण इच्छा.** परमेश्वराची बहुतेक सर्वसाधारण इच्छा पवित्र शास्त्रातील आज्ञा, तत्त्वे आणि उदाहरणांत आढळते. तुमच्या जीवनासाठी परमेश्वराची इच्छा जाणून घेण्याचा प्राथमिक स्रोत पवित्र शास्त्र आहे. *"तुझे वचन माझ्या पावलांसाठी दिव्यासारखे व माझ्या मार्गावर प्रकाशासारखे आहे"* स्तोत्र ११९:१०५.

1. आज्ञा. सर्व विश्वासणाऱ्यांसाठी पवित्र शास्त्रात अनेक आज्ञा आहेत, जसे की, *"सर्वदा आनंदित असा; निरंतर प्रार्थना करा; सर्व स्थितीत उपकारस्तुती करा; कारण तुमच्याविषयी ख्रिस्त येशूमध्ये देवाची इच्छा हीच आहे"* १ थेस्सल ५:१६-१८. आणि *"कारण देवाची इच्छा ही आहे की, . . . तुम्ही जारकर्मापासून स्वतःला अलिप्त ठेवावे"* १ थेस्सल ४:३. येशू म्हणाला, *"माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल"* योहान १४:१५. आज्ञांचा संदर्भ समजून घ्या. परमेश्वराने नोहाला तारू बांधण्यास सांगितले, उत्पत्ती ६:१४. परमेश्वराने तुम्हाला तसे करण्यास सांगितले नाही. परमेश्वराने दाविदाला हेब्रोनला जाण्यास सांगितले, २ शमुवेल २:१. परमेश्वराने तुम्हाला तसे करण्यास सांगितले नाही. कोणत्याही आज्ञेचा तिच्या संदर्भाबाहेर अर्थ लावू नका.

2. तत्त्वे. तुमच्यासाठी पालन करण्यासाठी पवित्र शास्त्राधारित तत्त्वे आहेत. चांगल्या कारभारीपणाचे तत्त्व लूक १६:१-१३ मध्ये आहे. शिष्यत्वाची किंमत लूक १४ च्या शेवटी आहे. हरवलेल्या लोकांचा शोध घेण्याचे तत्त्व लूक १५ मधील तीन दाखल्यांत आहे. ही आणि पवित्र शास्त्रातील इतर तत्त्वांचे पालन करा.

3. उदाहरणे. पवित्र शास्त्रातील आज्ञा आणि तत्त्वे तुमच्या जीवनासाठी परमेश्वराची सर्वसाधारण इच्छा प्रकट करतात. पवित्र शास्त्रात आपल्यासाठी अनुसरण करण्यासारखी उदाहरणे आहेत. सर्वोत्तम उदाहरण म्हणजे येशूचे जीवन. शिष्यांचे पाय धुतल्यानंतर येशू म्हणाला, *"कारण जसे मी तुम्हांला केले तसे तुम्हीही करावे म्हणून मी तुम्हांला कित्ता घालून दिला आहे"* योहान १३:१५. आपण त्याच्या नम्रतेच्या उदाहरणाचे अनुसरण केले पाहिजे, फिलिप्पै २:३-५. आपण त्याच्या पावलांवरून चालले पाहिजे, *"कारण ह्याचकरता तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे; कारण ख्रिस्तानेही तुमच्यासाठी दुःख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्याकरता कित्ता घालून दिला आहे"* १ पेत्र २:२१. *"ह्यावरून आपल्याला कळून येते की, आपण त्याच्या ठायी आहोत. मी त्याच्या ठायी राहतो, असे म्हणणार्याने तो जसा चालला तसे स्वतःही चालले पाहिजे"* १ योहान २:६.

**एक इशारा.** परमेश्वर खोटे बोलत नाही, स्तोत्र ११९:१६०. परमेश्वर तुम्हाला त्याच्या वचनाची अवज्ञा करण्यास मार्गदर्शन करणार नाही किंवा तसे सांगणार नाही. आपल्याला सुसज्ज करण्यासाठी येशूने पुढारी दिले आहेत, इफिस ४:११-१४. तथापि, अनेक खोटे शिक्षक आहेत, २ तीमथ्य ४:३-४. परमेश्वर तुम्हाला त्याच्या वचनाची अवज्ञा करण्यास सांगत आहे, असा विश्वास कधीही ठेवू नका. परमेश्वर असे करणार नाही. जर एखादा मंडळीचा पुढारी तुम्हाला परमेश्वराच्या वचनाची अवज्ञा करण्यास सांगत असेल, तर ते खोटे शिक्षण आहे.

**परमेश्वराची वैयक्तिक इच्छा.** विश्वासणाऱ्यांसाठी परमेश्वराची वैयक्तिक इच्छा असते, स्तोत्र ३२:८, नीतिसूत्रे ३:५-६. परमेश्वराच्या सर्वसाधारण इच्छेचे पालन करा. मग त्याची वैयक्तिक इच्छा जाणून घेण्यासाठी, परमेश्वराने तुम्हाला सांगावे म्हणून त्याला कळकळीने विचारा. त्याचे उत्तर त्याच्या वचनातून, त्याच्या ज्ञानातून, त्याच्या लोकांकडून  आणि त्याच्या शांतीतून शोधा.

**मागा**. दाविदाची प्रार्थना करा, *"तुझ्या इच्छेप्रमाणे वागण्यास मला शिकव"* स्तोत्र १४३:१०. प्रेषित पौलाने प्रार्थना केली की कलस्सै येथील विश्वासणारे *"तुम्ही त्याच्या इच्छेसंबंधीच्या पूर्ण ज्ञानाने भरले जावे"* कलस्सै १:९. स्वतःसाठी आणि इतरांसाठी तुमची मनापासूनची प्रार्थना ही असली पाहिजे की परमेश्वराची इच्छा जाणावी आणि ती पूर्ण करावी.

**मार्गदर्शन मिळवा.** परमेश्वर त्याच्या वचनातून, त्याच्या ज्ञानातून, त्याच्या लोकां कडून आणि त्याच्या शांतीतून आपली वैयक्तिक इच्छा प्रकट करतो. परमेश्वराने त्याची इच्छा तुम्हाला प्रकट करावी म्हणून त्याच्याकडे मागा. तो तुमच्या प्रार्थनांना पुढील माध्यमांद्वारे उत्तर देईल:

1. त्याचे वचन. परमेश्वराची वैयक्तिक इच्छा जाणणे हे नियमित पवित्र शास्त्र अभ्यासाचे फळ आहे. त्याच्या वचनांतून तुम्ही ज्ञान आणि समज प्राप्त करता तशी तुमच्यासाठी परमेश्वराची इच्छा स्पष्ट होत जाते. तो तुम्हाला त्याच्या वचनाच्या विरुद्ध काहीही करण्याचे मार्गदर्शन कधीही करणार नाही.

2. त्याचे ज्ञान. परमेश्वराचे ज्ञान आध्यात्मिक आज्ञाधारकतेतून येते, १ करिंथ. २:१४-१५. *"देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या"* रोम १२:२. परमेश्वराकडे त्याचे ज्ञान मागा, *"जर तुमच्यापैकी कोणी ज्ञानाने उणा असेल तर त्याने ते देवाजवळ मागावे म्हणजे ते त्याला मिळेल"* याकोब १:५.

3. त्याचे लोक. परमेश्वराची इच्छा समजून घेण्यासाठी परमेश्वराचे लोक एक साधन आहेत. जे लोक बोलण्याद्वारे किंवा लेखनाद्वारे त्याचे वचन अचूकपणे शिकवतात, ते मदत करू शकतात, कलस्सै १:२८. परिपक्व विश्वासणाऱ्यांकडून सल्ला घेणे चांगले आहे. एकापेक्षा अधिक सल्लागार असणे चांगली कल्पना आहे, *"मसलत मिळाली नाही म्हणजे बेत निष्फळ होतात. मसलत देणारे पुष्कळ असले तर ते सिद्धीस जातात"* नीतिसूत्रे १५:२२. परिपक्व विश्वासणारे चुकूच शकत नाहीत असे नाही, पण परमेश्वराची इच्छा ओळखण्यास मदत होईल अशी अर्थपूर्ण अंतर्दृष्टी ते तुम्हाला देऊ शकतात.

4. त्याची शांती. परमेश्वराची शांती ही त्याच्या वैयक्तिक इच्छेची अंतिम पुष्टी आहे, *"ख्रिस्ताची शांती तुमच्या अंतःकरणांत राज्य करो,"* कलस्सै ३:१५. *"म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेली शांती तुमची अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्या ठायी राखील"* फिलिप्पै ४:७. ही शांती म्हणजे प्रार्थना, पवित्र शास्त्राचा अभ्यास, आध्यात्मिक ज्ञान आणि आध्यात्मिकदृष्ट्या परिपक्व सल्लागारांकडून मिळालेली अंतर्दृष्टी यांनंतर निर्णयाविषयी परमेश्वराकडून मिळणारी योग्यतेची खोल जाणीव आहे. त्याची शांती शोधा आणि तिची प्रतीक्षा करा.

**कृती करा.** जेव्हा तुम्ही एखादया गोष्टीविषयी त्याची इच्छा आहे का असे विचारता, तेव्हा उत्तर "नाही" असे असू शकते, जसे पौलाच्या बाबतीत झाले, २ करिंथ. १२:७-१०. ते "थांब" असेही असू शकते. त्याचे "थांब" हे उत्तर मोठ्या आशीर्वादाला कारणीभूत ठरू शकते, यशया ४०:३१. जेव्हा परमेश्वराचे उत्तर "होय" असे असते, तेव्हा त्याची इच्छा पूर्ण करा, जरी ती कठीण, अप्रिय किंवा त्यासाठी मोठी किंमत चुकवावी लागणारी असली तरी. आपण आपल्या अंतःकरणापासून त्याची इच्छा पूर्ण करण्यात आनंद मानला पाहिजे, स्तोत्र ४०:८, इफिस ६:५-६. ख्रिस्ती धर्माच्या संप्रदायाच्या शिकविल्या जाणाऱ्या बनावट उत्तरांपासून सावध राहा. परमेश्वराची इच्छा तुम्हाला नक्की कळली आहे याची खात्री झाल्यावर आज्ञापालन करा.

---

*मी परमेश्वराची इच्छा कशी जाणून घेऊ?* © २०२६ जॉन डी. मॉरिस III, Acts One Eight द्वारे प्रकाशित. ही संपूर्ण सूचना समाविष्ट करून आणि मजकूर अपरिवर्तित ठेवून तुम्ही हे स्वेच्छेने छापू शकता, कॉपी करू शकता, पोस्ट करू शकता, ईमेल करू शकता किंवा संदेशाद्वारे पाठवू शकता. तुम्ही पहिल्या पानाच्या वरच्या भागात तुमच्या सेवाकार्याचे किंवा मंडळीचे नाव किंवा लोगो जोडू शकता आणि दुसऱ्या पानाच्या खालच्या भागाजवळील ठोस रेषेच्या वर तुमची संपर्क माहिती जोडू शकता. WillofGod316.org फक्त पवित्र शास्त्रावर आधारित आहे. विश्वासणाऱ्यांना परमेश्वराची इच्छा शोधण्यात मदत करणे हा त्याचा उद्देश आहे. तुम्ही Acts One Eight ला ईमेल करू शकता (शक्य असल्यास इंग्रजीत): Hello@Mail316.org. अनुवाद सेवा www.ChristianLingua.com यांनी पुरविल्या आहेत. *मी परमेश्वराची इच्छा कशी जाणून घेऊ?* हे www.WillofGod316.org. वर अठ्ठेचाळीस भाषांमध्ये विनामूल्य उपलब्ध आहे. इंग्रजी आवृत्तीतील पवित्र शास्त्रातील उद्धरणे The Lockman Foundation's New American Standard Bible 1995 मधून घेतली आहेत. या अनुवादातील पवित्र शास्त्रातील उद्धरणे Marathi R.V. (Re-edited) Bible, पवित्र शास्त्र Copyright © 2015 by The Bible Society of India  मधून घेतली आहेत.